# बेस्ट कन्व्हीक्शन ऑफ दि मंथ माहे एप्रील— २०१८

## धारावी पोलीस ठाणे, मुंबई.

| | | |
|---|---|---|
| १ | **गु.र.क्र व कलम** | धारावी पोलीस ठाणे गुरक्र.५००/२०१३ कलम ३६३,३७६,३४ भादंवि. सह कलम ४,८,१२ पोक्सो कायदा सह कलम ३,४,५,७ पिटा ॲक्ट |
| २ | **गुन्हा घडला दिनांक** | सुमारे एक वर्षापासुन दिनांक १०/१०/२०१३ रोजी पर्यंत |
| ३ | **गुन्हयाचे ठिकाण** | ओम साई गार्डन चाळ सेवा समिती, राजीव गांधी नगर, धारावी डेपोसमोर, धारावी, मुंबई १७ |
| ४ | **फिर्यादी** | श्रीमती सुलताना करीम सय्यद वय ५५ वर्षे |
| ५ | **बळीत/मयत्त** | फिर्यादी यांची १५ वर्षीय अल्पवयीन नात |
| ६ | **आरोपी अटक** | महिला आरोपी क्र १) रिझवाना फिरोज खान वय ३० वर्षे,<br>महिला आरोपी क्र २) रेश्मा नासीर सय्यद वय ३४ वर्षे,<br>महिला आरोपी क्र ३) रझिया मोहम्मद अरिफ शेख वय ३७ वर्षे<br>**अटक दिनांक १४/१२/२०१३ रोजी १८.३० वा.** |

धारावी पोलीस ठाणे गुरक्र.५००/२०१३ कलम ३६३,३७६,३४ भादंवि. सह कलम ४,८,१२ पोक्सो कायदा सह कलम ३,४,५,७ पिटा ॲक्ट या गुन्हयात सुमारे एक वर्षापासुन दिनांक १०/१०/२०१३ रोजी पर्यंत ओम साई गार्डन चाळ सेवा समिती, राजीव गांधी नगर, धारावी डेपोसमोर, धारावी, मुंबई १७.याठिकाणी यातील फिर्यादी यांचे कायदेशिर रखवालीत असलेली त्यांची १५ वर्षीय अल्पवयीन नात हिस यातील आरोपी नामे सौ. रिजवाना, सौ. रेश्मा, सौ. रझिया व अनोळखी इसम यांनी नशापाणीची सवय लावून फिर्यादींच्या परवानगीशिवाय त्यांच्या कायदेशिर रखवालीतुन घेवून जावून तिला विविध ठिकाणी विविधी इसमांसोबत वेश्या व्यवसाय करण्यास जबरदस्तीने प्रवृत्त केले तसेच अनोळखी इसमांनी तीचेसोबत लैगिक अत्याचार केला म्हणुन दिनांक १४/१२/२०१३ रोजी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

धारावी पोलीस ठाणेच्या पथकाने मानवी कौशल्य वापरून दिनांक १४/१२/२०१३ रोजी १८.३० वा. महिला आरोपी क्र. १) रिझवाना फिरोज खान वय ३० वर्षे, २) रेश्मा नासीर सय्यद वय ३४ वर्षे व ३) रझिया मोहम्मद अरिफ शेख वय ३७ वर्षे यांना नमुद गुन्हयात अटक केली. नमुद गुन्हयाचा सखोल तपास करून महिला आरोपीतांविरूध्द सबळ पुरावा मिळवुन दिनांक १०/०२/२०१४ रोजी मा. विशेष पोक्सो न्यायालय, मुंबई येथे पोक्सो केस क्र. ५०/२०१४ अन्वये सदर गुन्हयाचे दोषारोप पत्र दाखल केले.

सदर पथकाने मा. विशेष पोक्सो न्यायालय, मुंबई येथे सरकारी पक्षातर्फे समर्थपणे बाजु मांडुन सदर गुन्हयातील फिर्यादी, पंच, साक्षीदार यांना सुनावणीचे वेळी हजर ठेवून तसेच सबळ परिस्थीतीजन्य पुरावा तसेच वैदयकीय अहवाल, रासायनिक प्रयोगशाळेचे अहवाल आणि फिर्यादी जबाब, तसेच पुरक साक्षीदार/पंच सादर करून दिनांक २५/०४/२०१८ रोजी मा. विशेष पोक्सो न्यायालय, मुंबई यांनी **महिला** आरोपी क्र. १) रिझवाना फिरोज खान वय ३० वर्षे, २) रेश्मा नासीर सय्यद वय ३४ वर्षे व ३) रझिया मोहम्मद अरिफ शेख वय ३७ वर्षे यांना पुढीलप्रमाणे शिक्षा दिलेली आहे.

**मा. न्यायालयाने यातील आ.क्र.१) रिझवाना फिरोज खान वय ३० वर्षे हिस दिलेली शिक्षा पुढीलप्रमाणे :—**

**अ)** भादवि कलम ३२८ सह ३४ प्रमाणे **०४ वर्षे सश्रम कारावास** व रु.३,०००/—द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०३ महिने सश्रम कारावास,

**ब)** भादवि कलम ३६३ प्रमाणे **०३ वर्षे सश्रम कारावास** व रु.३,०००/—द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०३ महिने सश्रम कारावास,

**क)** भादवि कलम ३७०(४) सह ३४ प्रमाणे **आजन्म कारावास** व रु.२०,०००/—द्रव्यदंड, दंड न भरल्यास

०६ महिने सश्रम कारावास,

**ड)** पोक्सो कायदा कलम १२ प्रमाणे **०२ वर्षे सश्रम कारावास** व रु.५,०००/—द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावास,

**तसेच मा. न्यायालयाने यातील आ.क्र.२) रेश्मा नासीर सय्यद वय ३४ वर्षे हिस दिलेली शिक्षा पुढीलप्रमाणे :—**

**अ)** भादवि कलम ३२८ सह ३४ प्रमाणे **०४ वर्षे सश्रम कारावास** व रु.३,०००/—द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०३ महिने सश्रम कारावास,

**ब)** भादवि कलम ३६३ प्रमाणे **०३ वर्षे सश्रम कारावास** व रु.३,०००/—द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०३ महिने सश्रम कारावास,

**क)** भादवि कलम ३७०(४) सह ३४ प्रमाणे **आजन्म कारावास** व रु.२०,०००/—द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावास,

**ड)** पोक्सो कायदा कलम १२ प्रमाणे **०२ वर्षे सश्रम कारावास** व रु.५,०००/—द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावास,

**तसेच मा. न्यायालयाने यातील आ.क्र.३) रझिया मोहम्मद अरिफ शेख वय ३७ वर्षे हिस दिलेली शिक्षा पुढीलप्रमाणे :—**

**अ)** भादवि कलम ३२८ सह ३४ प्रमाणे **०४ वर्षे सश्रम कारावास** व रु.३,०००/—द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०३ महिने सश्रम कारावास,

**ब)** भादवि कलम ३६३ प्रमाणे **०३ वर्षे सश्रम कारावास** व रु.३,०००/—द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०३ महिने सश्रम कारावास,

**क)** भादवि कलम ३७०(४) सह ३४ प्रमाणे **आजन्म कारावास** व रु.२०,०००/—द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावास,

**ड)** पोक्सो कायदा कलम १२ प्रमाणे **०२ वर्षे सश्रम कारावास** व रु.५,०००/—द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावास,

वरिल सर्व शिक्षा दोषसिध्द आरोपीतांनी एकत्र भोगायच्या आहेत. त्याचप्रमाणे शिक्षेत नमुद केलेल्या दंडाच्या सर्व रकमा अपील कालावधी संपल्यानंतर बळीत मुलीस देण्याबाबत मा. न्यायालयाने आदेशित केलेले आहे.

फिर्यादी यांची १५ वर्षीय अल्पवयीन नातीला नशापाणीची सवय लावून फिर्यादींच्या परवानगीशिवाय त्यांच्या कायदेशिर रखवालीतुन घेवून जावून तिला विविध ठिकाणी विविध इसमांसोबत वेश्या व्यवसाय करण्यास जबरदस्तीने प्रवृत्त करणाऱ्या तीन महिला आरोपींना धारावी पोलीस ठाणेच्या पथकाने अटक करून त्याचेविरूध्द दोषारोप पत्र दाखल केले व मा. विशेष पोक्सो न्यायालय, मुंबई येथे सरकारी पक्षातर्फे समर्थपणे बाजु मांडुन सबळ पुरावे व साक्षीदार सादर केल्याने आरोपी महिलांना शिक्षा झालेली आहे.

सदर संवेदनशील गुन्हा दोषसिध्द झाल्याने मा. पोलीस आयुक्तांनी त्यांना माहे एप्रील — २०१८ चे बेस्ट कन्व्हेक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे दोषसिध्दी पारितोषिकाने सन्मानित केलेले आहे.

**धारावी पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी/अंमलदार**

| अ.क्र. | अधिकारी व अंमलदाराचे नाव | अ.क्र. | अधिकारी व अंमलदाराचे नाव |
|---|---|---|---|
| १ | सपोनि प्रसाद अरूण राऊत | ४ | पो.ना.क्र.९७०७७२/लक्ष्मण फकीरा गायकवाड |
| २ | स.पो.उ.नि.क्र.२०४६८/तुळशीराम कृष्णा म्हस्के | ५ | पो.ना.क्र.०३.७५६/किशोर रमेश भोये |
| ३ | म.पो.ना.क्र.६९२/पौर्णीमा राजेन्द्र पवार | —— | —— |

—— ००० ——